**फिर्यादीचा शपथेवर उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. आर.आय. राजपुत यांचे मार्फत सुरु–**

२. माझ्या भावाचे नांव अशोक हुला पाटील असे आहे. ते साधारण सात ते नऊ वर्षापुर्वी पर्यत तलाठी होते. मी फिर्याद देत असतांना अशोक हा माझ्या सोबत होता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीतील मजकुर हा संपुर्णपणे अशोक याने सांगीतला.

३. मी फिर्याद देत असतांना 'आमच्यामध्ये रस्त्यावरुन वाद सुरु आहे, सदर वादाचे कारणावरुन आरोपींनी मला विचारणा केली की तु आम्हांला रस्ता का वापरु देणार नाही, मी त्याला म्हणालो की माझे एकच क्षेत्र आहे, आपण बसुन वाद मिटवुन घेवु' ही बाब सांगीतली होती. परंतु सदर बाबी माझ्या फिर्यादीमध्ये का नमुद केलेल्या नाहीत याचे कारण मला सांगता येणार नाही. तसेच, मी फिर्याद देतांना 'तसेच त्यांनी मला कुऱ्हाडीचा धाक दाखवला' ही बाब देखील सांगीतली होती. परंतु सदर बाब माझ्या फिर्यादीमध्ये का नमुद केलेली नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १२.१२.२०१६ रोजी आरोपी क्र. १ किरण रामदास बागल याने मी, माझा भाऊ अशोक व मुलगा शशिकांत यांनी त्याला लाठया काठयांनी मारहाण केलेबाबत, शिवीगाळ केलेबाबत व दमदाटी केलेबाबत दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत या न्यायालयामध्ये आर.सी.सी. क्र. १३/२०१७ हा खटला दाखल झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, चार्जशिट दाखल झाल्यानंतर दिनांक १५.१२.२०१६ रोजी आम्ही तिघांनी न्यायालयामध्ये जामीन दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२.१२.२०१६ रोजी आम्ही किरण रामदास बागल याच्या शेतात गेलो होतो व तेथे त्याला लाठया काठयांनी मारहाण केली होती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १५.१२.२०१६ रोजी जामी दिल्यानंतर मी प्रस्तुत फिर्याद आरोपींविरुध्द दाखल केलेली आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, आरोपींनी मारहाण केली म्हणुन मी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे.

प्रश्न – आरोपी यांनी तुमच्या विरुध्द दिनांक १२.१२.२०१६ रोजी फिर्याद दिली म्हणुन तुम्ही त्यांच्या विरुध्द प्रस्तुतचसी फिर्याद दाखल केली?

उत्तर– त्यांनी आम्हांला मारहाण केली म्हणुन मी फिर्याद दाखल केली.

५. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी आम्हांला मारहाण केली म्हणुन मी फिर्याद दाखल केली हे मी खोटे सांगत आहे.

६. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ वासुदेव हा आरोपी क्र. १ याचा भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते सर्व वेगवेगळे राहतात. आर.सी.सी. १३/२०१७ मध्ये वासुदेव हा साक्षीदार आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर.सी.सी. १३/२०१७ मधील चार्जशिटच्या नकला मी घेतलेल्या आहेत. मला लिहीता वाचता येते. मी आर.सी.सी.१३/२०१७ मधील चार्जशिटच्या नकला मी वाचुन पाहिल्या आहेत किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वासुदेव याने आर.सी.सी. १३/२०१७ मध्ये आमच्या विरुध्द जबाब दिला असल्याने मी त्याच्या विरुध्द प्रस्तुत फिर्याद दिलेली आहे.

७. माझ्या फिर्यादीमध्ये जगदीश भटा व दिपक जगन्नाथ पवार हे साक्षीदार आहेत. हे म्हणणे खरे नाही की, जगदीश भटा व दिपक जगन्नाथ हे आमच्या गावातील असल्याने त्यांचे माझ्याकडे नेहमी येणेजाणे असते. हे म्हणणे खरे आहे की, माझी फिर्याद शाबीत व्हावी याकरीता मी या साक्षीदारांची नावे फिर्यादीत लिहीलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, निमगुळ हे बरेच मोठे गांव आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरील दोन्हीही साक्षीदार माझ्या घरापासुन बऱ्याच अंतरावर राहतात. वेळ पडली तर मी जगदीश भटा व दिपक जगन्नाथ यांची साक्ष घेणार आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२.१२.२०१६ रोजी आमच्या विरुध्द आरोपींनी दिलेल्या फिर्यादीला शह देण्याकरीता मी त्यांच्या विरुध्द प्रस्तुतची फिर्याद दिलेली आहे.

८. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२.१२.२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजताचे सुमारास मी घरात बसलेलो असतांना आरोपी क्र. १ व २ माझे घरी आले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला मारहाण केली, वाईट

शिवीगाळ केली व धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांनी माझी सुटका केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दोंडाईचा पोलीस ठाणे येथे आरोपींविरुध्द तक्रार दिली परंतु पोलीसांनी त्यांच्या विरुध्द काहीही कारवाई केली नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १२.१२.२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजताच्या सुमाराला मी माझ्या शेतामध्ये होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द वचपा काढण्यासाठी म्हणुन त्यांच्या विरुध्द जाणुन बुजुन खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत

**सही/–**

(आदित्य घ. नाईक)

स्थळ : दोंडाईचा,

दिनांक : १२/०२/२०२४

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा